प्रेसनोट दि.३०/१०/२०२६

लोखंडी सळई चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केलेबाबत ....

---ooo---

बांधकामाच्या सळया चोरांबाबत गुन्हे शाखेस माहिती प्राप्त झाली की, काही इसम आपआपसांत संगनमत करून, पैश्यांच्या मोबदल्यात ट्रेलरमधुन लोंखडी सळया चोरी करीत आहे. सदर माहितीच्या आधारे मा.वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली पथके तयार करून कारवाईसाठी रवाना करण्यात आले.

सदर माहीतीच्या अनुषंगाने दिनांक २८.१०.२०२६ सकाळी ०५.५५ वा. च्या सुमारास हायवे सुविधा शौचालय, पुर्व द्रुतगती महामार्गावर ठाणे कडून मुंबई दिशेस जाणाऱ्या रस्त्याच्या बाजुस, घाटकोपर पुर्व, मुंबई या ठिकाणी आरोपीतांनी आपसांत संगनमत करून पैश्यांच्या मोबदल्याम ३८,३८० किलो लोखंडी सळई एकूण कि.ग्रॅम वजनाचे किंमत रू.२३,०२,८००/- किंमतीचे लोखंडी सळई चोरी करतांना मिळून आले तसेच जुगानी इंडस्ट्रीयल इस्टेट, चुनाभट्टी मुंबई या ठिकाणी आरोपीतांनी आपसांत संगनमत करून पैश्यांच्या मोबदल्यात १,०४,७५० किलो लोखंडी सळई एकूण किंमत रूपये ३१,२३,१९०/- किंमतीचे लोखंडी सळई चोरी करताना मिळून आले त्यांना सापळा लावुन पकडण्यात आले. त्याबाबत गु.प्र.शा.,गु.र.क्र. १४६/२०२६, कलम ३०३ (२), ३१६, ३(५) भा.न्या.सं. २०२३ अन्वये (पंतनगर पो.ठाणे.गु.र.क्र. ११०७/२०२६) गुन्हा नोंद करून गुन्हयाचा पुढील तपास गुन्हे शाखेच्या कक्ष-७ मार्फत करण्यात येत आहे. सदरच्या कारवाईमध्ये अद्यापपर्यंत एकूण ५४,२५,९९०/- रूपये किंमतीच्या लोखंडी सळया व एकूण रू.१,१०,००,०००/- किंमतीचे ०३ ट्रेलर व ०१ आयशर टेम्पो अशी एकुण रू. १,६४,२५,९९०/- किंमतीची मालमत्ता जप्त करण्यात आली असून एकूण ०५ आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस आयुक्त, श्री.देवेन भारती, मा.पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.कृष्ण कान्त उपाध्याय, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१), श्री. नवनाथ ढवळे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (डी-पूर्व) श्री. धर्मपाल बनसोडे यांचे मार्गदर्शनाखाली कक्ष ७, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अनिल ढोले, पोलीस निरीक्षक श्री. प्रदिप सरफरे, स.पो.नि. धनाजी साठे, स.पो.नि अफरोज शेख, स.पो.नि. महेश शेलार, पो.उ.नि. अजय गोल्हार, पो.उ.नि. नामदेव परबळकर तसेच कक्ष ७ कार्यालयाचे पोलीस अंमलदार यांच्या पथकाने पार पाडली आहे.

--//--